महाराष्ट्र शासन

# ग्रामविकास व पंचायत राज विभाग

## मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानामध्ये लोकसहभाग

संयुक्त राष्ट्रसंघाने जाहीर केलेल्या "शाश्वत विकासासाठी जागतिक परिवर्तन कार्यक्रम २०३०" चा मुख्य गाभा "सर्वांना सोबत घेऊन चला" (Leave no one behind) हा आहे. या अनुषंगाने, ग्रामीण महाराष्ट्राच्या विकासात पंचायत राज संस्थांचे मोठे योगदान असून, ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकास करणे हे अभियानाचे मुख्य उद्दिष्ट आहे. लोकसहभाग या अभियानाचा आत्मा आहे. त्यासाठी खालील माध्यमातून लोकसहभाग घेतला जाणार आहे.

ग्रामपंचायतींमध्ये लोकसहभागाची चळवळ निर्माण करणे आणि ग्रामीण नागरिकांना सुलभ रीतीने सेवा देणे, ही या अभियानाची महत्त्वाची संकल्पना आहे.

अभियानाच्या सात मुख्य घटकांपैकी एक घटक "लोकसहभाग व श्रमदान माध्यमातून लोकचळवळ निर्माण करणे" हा आहे.

- **अभियानाच्या पूर्वतयारीमध्ये लोकसहभाग**

  अभियानाच्या पूर्वतयारीमध्ये दिनांक १७ सप्टेंबर रोजी ग्रामसभा व ग्रामस्तरीय समितीची स्थापना केली जाईल. तसेच, विविध विषयांवर लहान गट (small groups) स्थापन केले जातील. ग्रामसभा हा लोकसहभागाचा मूलभूत आधार आहे.

- **संनियंत्रण आणि अंमलबजावणीतील सहभाग**

  ग्रामपंचायत स्तरावर अभियानाची प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी सरपंच/प्रशासक यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात येईल. या समितीमध्ये ग्रामपंचायतीचे सर्व पदाधिकारी आणि गाव पातळीवरील सर्व अधिकारी/कर्मचारी सदस्य म्हणून कार्यरत राहतील. हे गावपातळीवरील प्रशासकीय सहभागाचे स्वरूप आहे.

  अभियान कालावधीत जास्तीत जास्त लोकांना सहभागी करून घेणे तसेच ग्रामपंचायतींना सहभागी करून घेण्यासाठी जिल्हा व तालुका स्तरावर व्यापक प्रसिद्धी देणे आवश्यक आहे.

- **जनजागृती आणि प्रोत्साहन**

  "मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाबाबत जनजागृती" करणे आणि "अभियानामध्ये लोकसहभाग वाढवण्यासाठी जास्तीत जास्त लोकांना प्रोत्साहित करणे" हे एक महत्त्वाचे उद्दिष्ट आहे. या कार्यक्रमाची जनतेस माहिती करून देणे आणि अंमलबजावणीचे समीक्षण करणे हे देखील लोकसहभागास पूरक आहे.

  समाज माध्यमांचा वापर- अभियानास इंस्टाग्राम, फेसबुक, यूट्यूब या ॲप्सवर व्यापक प्रसिद्धी देऊन लोकसहभाग वाढवण्याचे प्रयत्न केले जातील.

- **मूल्यमापनाच्या निकषांमध्ये लोकसहभाग**

  - 'सुशासनयुक्त पंचायत' या घटकांतर्गत ग्रामपंचायतीमार्फत दिल्या जाणाऱ्या सर्व सेवा नागरिकांना ऑनलाइन पद्धतीने सुलभरीत्या देणे, नागरी सेवा सुविधा केंद्र (CSC) सक्रिय करणे आणि तक्रार निवारण यंत्रणा प्रभावीपणे राबवणे यांचा समावेश आहे. यातून नागरिकांना सहज सेवा मिळतील आणि त्यांच्या तक्रारींचे निवारण होईल, ज्यामुळे लोककेंद्री प्रशासनाला प्रोत्साहन मिळेल.
  - **'मतदार/नागरिकांनी ॲप डाऊनलोड करणे'**: शासनाच्या विविध ॲप्स (उदा. मेरी पंचायत, पंचायत निर्णय, ग्रामसंवाद) बाबत प्रचार व प्रसिद्धी करून मतदारांनी/नागरिकांनी किमान एक तरी ॲप डाऊनलोड करावे, यासाठी प्रोत्साहन दिले जाईल. एकूण मतदारसंख्येपैकी ५०% (२००० पर्यंत लोकसंख्या), ४०% (२००० ते ५००० लोकसंख्या) आणि ३०% (५००० पेक्षा जास्त लोकसंख्या) मतदारांनी ॲप डाऊनलोड करण्याचे उद्दिष्ट आहे.
  - **'लोकवगणी' (Public Contribution)**: लोकवर्गणीतून निधी उपलब्ध करून घेणे आणि तो लोकोपयोगी सुविधांसाठी वापरणे हे अभियानाचा एक महत्त्वाचा भाग आहे. प्रति एक हजार लोकसंख्येमागे दोन लाख रुपये लोकवर्गणी जमा करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे.
  - **'पाण्याचा ताळेबंद' (Water Budget)**: जनजागृती, शिवार फेरी इत्यादी उपक्रमांतून लोकसहभागातून पाण्याचा ताळेबंद (वॉटर बजेट) तयार करून पाणी व्यवस्थापन आराखडा तयार करणे अपेक्षित आहे.
  - **'बचत गट आणि महिलांचा सहभाग'**: बचत गटांमधील महिलांना 'लखपती दिदी' बनवण्यासाठी प्रोत्साहन देणे. तसेच, स्वयंसहायता समूह आणि शेतकरी उत्पादक संस्थांमध्ये महिलांचा सहभाग वाढवणे.
  - **'शेतकऱ्यांचा गटशेतीमध्ये सहभाग'**: गावातील शेतकऱ्यांनी गटशेतीमध्ये सहभागी होऊन शेतकरी उत्पादक संस्था स्थापन करणे, सेंद्रिय शेतीस प्रोत्साहन देणे आणि गटाद्वारे व्यवसाय करणे.
  - **'लोकसहभाग व श्रमदान'**: आठवड्यातून किमान एक दिवस श्रमदान करून गावात स्वच्छता राखण्याची चळवळ उभी करणे. यात लोकसंख्येनुसार १०० ते ३०० ग्रामस्थांनी सहभागी होणे अपेक्षित आहे.

या सर्व तरतुदींमधून "मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान" मध्ये सार्वजनिक सहभागाला अत्यंत महत्त्व दिले गेले आहे.







महाराष्ट्र शासन

# ग्रामविकास व पंचायत राज विभाग

## 'मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान'

ग्रामीण महाराष्ट्राच्या विकासामध्ये पंचायतराज संस्थांचे मोठे योगदान असून त्रिस्तरीय पंचायत राज संस्थेमार्फत ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकास करणे हे मुख्य ध्येय आहे .राज्यातील विकासाच्या बहुतांश योजना पंचायतराज संस्थामार्फत राबविले जातात .त्या अनुषंगाने ग्रामीण भागात स्थानिक स्वराज्य संस्था म्हणून काम करणाऱ्या ग्रामपंचायत ,पंचायत समिती, व जिल्हा परिषद यांना कामगिरीनुसार प्रोत्साहित करून त्यांची कार्यक्षमता वाढविणे आवश्यक आहे. ग्रामविकास विभाग व शासनाच्या इतर विभागांच्या विविध योजना जिल्हा परिषदेमार्फत राबविल्या जातात . सदर योजनांची प्रभावी व जलदगतीने अंमलबजावणी करून त्यांचा लाभ ग्रामीण भागातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविणे , यातून ग्रामीण भागातील लोकांचे जीवनमान उंचावणे ,ग्रामपंचायत मध्ये लोकसहभागाची चळवळ निर्माण करणे, ग्रामीण नागरिकांना सुलभ रीतीने सेवा देणे, महाराष्ट्रातील थोर संत परंपरेचा सहभाग घेणे, आरोग्य, शिक्षण, उपजीविका, सामाजिक न्याय या मुख्य क्षेत्रांमध्ये ग्रामपंचायतीचा सहभाग वाढवून पंचायत राज संस्था गतिमान करणे या संकल्पनेतून "मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान" राज्य शासनाने जाहीर केले आहे.

**अभियानाचे मुख्य ७ घटक (Main Components):**

१) सुशासन युक्त पंचायत (लोकाभिमुख सक्षम पंचायत शासन)

२) सक्षम पंचायत (स्वनिधी, CSR व लोकवर्गणीतून पंचायत राज संस्थांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करणे)

३) जल समृद्ध, स्वच्छ व हरित गाव निर्माण करणे

४) मनरेगा व इतर योजनांचे अभिसरण करणे

५) गावपातळीवरील संस्था सक्षमीकरण करणे

६) उपजीविका विकास, सामाजिक न्याय

७) लोकसहभाग व श्रमदान माध्यमातून लोकचळवळ निर्माण करणे

**१. अभियानाचा कालावधी - दिनांक १७ सप्टेंबर ते ३१ डिसेंबर असा राहील.**

**२. अभियानाची पूर्व तयारी:**

- दिनांक १ ऑगस्टपासून अभियानाची पूर्व तयारी सुरू होईल, ज्यात राज्य, विभाग, जिल्हा व तालुका स्तरावर बैठका.
- तालुका व जिल्हा स्तरावर प्रशिक्षण तसेच ग्रामपंचायतींनाही प्रशिक्षण.
- ग्राम स्तरावर अभियानाच्या पूर्व तयारी करिता तालुकास्तरीय अधिकाऱ्यांना ग्रामपंचायतीकडे संपर्क अधिकारी म्हणून नेमणूक.
- दिनांक १७ सप्टेंबर रोजी ग्रामसभा आणि ग्रामस्तरीय समितीची स्थापना.
- ऑक्टोबर व नोव्हेंबर महिन्यात संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानाची प्रभावी अंमलबजावणी.

**३. विविध स्तरांवर संनियंत्रण**

**अ. राज्य स्तरावर संनियंत्रण समिती:**

"मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियाना"च्या अंमलबजावणी व संनियंत्रणासाठी राज्य स्तरावर एक संनियंत्रण समिती स्थापन करण्यात येत आहे.

**ब. ग्रामपंचायत स्तरावर अंमलबजावणी समिती:**

अभियानामध्ये ग्रामपंचायतींची महत्त्वपूर्ण भूमिका असल्याने, ग्रामपंचायत स्तरावर प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी सरपंच/प्रशासक यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात येईल.

- या समितीमध्ये ग्रामपंचायतीचे सर्व पदाधिकारी आणि गाव पातळीवरील सर्व अधिकारी/कर्मचारी सदस्य म्हणून कार्यरत राहतील.
- ग्रामपंचायत अधिकारी हे समितीचे सदस्य सचिव असतील.

**क. विभाग, जिल्हा व पंचायत समिती (तालुका) स्तरावर संनियंत्रण व मूल्यमापन:**

अभियानांतर्गत निर्देशांची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यासाठी विभाग, जिल्हा व पंचायत समिती स्तरावर संनियंत्रण व मूल्यमापन यंत्रणा समिती नियोजन करेल:

- **विभागीय स्तरावर:** विभागीय आयुक्त हे विभागातील प्रत्येक जिल्ह्यासाठी अपर आयुक्त/उपायुक्त/उपसंचालक/सहआयुक्त या दर्जाच्या अधिकाऱ्यांची पालक अधिकारी म्हणून नेमणूक करतील.
- **जिल्हा स्तरावर:** मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद हे जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यासाठी जिल्हा परिषद, विभाग प्रमुखांची पालक अधिकारी नेमणूक करतील.
- **पंचायत समिती (तालुका) स्तरावर:** गटविकास अधिकारी, पंचायत समिती हे त्यांच्या तालुक्यातील जिल्हा परिषद मतदारसंघासाठी, पंचायत समितीमधील विभाग प्रमुखांची संपर्क अधिकारी म्हणून नेमणूक करतील.
- ग्रामपंचायतींची विविध स्तरांवर पुरस्कारासाठी निवड करण्याकरिता मूल्यमापनासाठी तालुका, जिल्हा, विभाग व राज्य स्तरावर समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत.

**४. मूल्यमापन प्रक्रिया**

- ग्रामपंचायतींकडून प्राप्त झालेले मूल्यमापन प्रस्ताव तालुकास्तरीय समितीकडून तपासले जातील. तालुकास्तरीय समिती सर्वाधिक गुण मिळवलेल्या ३ ग्रामपंचायतींची "तालुकास्तरीय अत्युत्कृष्ट ग्रामपंचायत" म्हणून निवड करेल, तसेच २ ग्रामपंचायतींना विशेष पुरस्कारासाठी निवडेल.
- जिल्हा, विभाग आणि राज्य स्तरांवर देखील पुरस्कारासाठी निवड प्रक्रिया याच पद्धतीने केली जाईल.
- पंचायत समित्या आणि जिल्हा परिषदांसाठीही याच धर्तीवर पुरस्कार दिले जातील.
- **मूल्यमापनाच्या अंतिम तारखा:**

ग्रामपंचायतीकडून तालुकास्तरीय समितीकडे अर्ज व मूल्यमापन प्रस्ताव सादर करणे: १० जानेवारी.

**तालुकास्तरीय मूल्यमापन: ११ जानेवारी ते २६ जानेवारी.**

**जिल्हास्तरीय मूल्यमापन: २८ जानेवारी ते १५ फेब्रुवारी.**

**विभागस्तरीय मूल्यमापन: १७ फेब्रुवारी ते २७ फेब्रुवारी.**

**राज्यस्तरीय मूल्यमापन: संपूर्ण मार्च महिना.**

## मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानातील ग्रामपंचायतींना देण्यात येणा-या पुरस्कारांचे स्वरुप

## विविध स्तरांवर पुरस्कारांसाठी भरीव रक्कम

### ग्रामपंचायतींसाठी चार स्तरांवर पुरस्कार:

तालुका स्तर:

- प्रथम पुरस्कार: ₹15 लाख (351 ग्रामपंचायतींसाठी).
- द्वितीय पुरस्कार: ₹12 लाख (351 ग्रामपंचायतींसाठी).
- तृतीय पुरस्कार: ₹8 लाख (351 ग्रामपंचायतींसाठी).
- विशेष पुरस्कार: ₹5 लाख (प्रत्येक तालुक्यातील 2, म्हणजेच 702 ग्रामपंचायतींसाठी).

जिल्हा स्तर:

- प्रथम पुरस्कार: ₹50 लाख (34 ग्रामपंचायतींसाठी).
- द्वितीय पुरस्कार: ₹30 लाख (34 ग्रामपंचायतींसाठी).
- तृतीय पुरस्कार: ₹20 लाख (34 ग्रामपंचायतींसाठी).

विभाग स्तर

- प्रथम पुरस्कार: ₹1 कोटी (6 ग्रामपंचायतींसाठी).
- द्वितीय पुरस्कार: ₹80 लाख (6 ग्रामपंचायतींसाठी).
- तृतीय पुरस्कार: ₹60 लाख (6 ग्रामपंचायतींसाठी).

राज्य स्तर:

- प्रथम पुरस्कार: ₹5 कोटी.
- द्वितीय पुरस्कार: ₹3 कोटी.
- तृतीय पुरस्कार: ₹2 कोटी.

पुरस्कार प्राप्त ग्रामपंचायतींना शासनाच्या वतीने पुरस्कार व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येणार. विभागीय व राज्यस्तरीय पुरस्कार मे महिन्यात मा. राज्यपाल आणि मा. मुख्यमंत्री यांच्या हस्ते प्रदान केले जाणार. योजनेसाठी दरवर्षी एकूण ₹290.33 कोटी इतका खर्च मंजूर असून त्यामध्ये पुरस्कार निधीचा प्रमुख समावेश आहे.

### पंचायत समित्यांसाठी पुरस्कार:

- विभाग स्तर:

प्रथम पुरस्कार: ₹1 कोटी (6 पंचायत समित्यांसाठी).
द्वितीय पुरस्कार: ₹75 लाख (6 पंचायत समित्यांसाठी).
तृतीय पुरस्कार: ₹60 लाख (6 पंचायत समित्यांसाठी).

- राज्य स्तर:

प्रथम पुरस्कार: ₹2 कोटी.
द्वितीय पुरस्कार: ₹1.5 कोटी.
तृतीय पुरस्कार: ₹1.25 कोटी.

### जिल्हा परिषदांना पुरस्कार

- राज्य स्तर:

प्रथम पुरस्कार: ₹5 कोटी.
द्वितीय पुरस्कार: ₹3 कोटी.
तृतीय पुरस्कार: ₹2 कोटी.

पुरस्कार प्राप्त ग्रामपंचायत, पंचायत समिती आणि जिल्हा परिषदांना शासनाच्या वतीने पुरस्कार व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येणार.
विभागीय व राज्यस्तरीय पुरस्कार मे महिन्यात माननीय राज्यपाल आणि माननीय मुख्यमंत्री यांच्या हस्ते प्रदान केले जाणार.

महाराष्ट्र शासन

# ग्रामविकास व पंचायत राज विभाग

## "मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान" गुणांकन प्रणाली (evaluation and marking system)

**अभियानांतर्गत ग्रामपंचायतींच्या कामगिरीचे मूल्यमापन खालील ८ मुख्य घटकांवर आधारित असुन त्यांसाठी एकूण १०० गुण आहेत:**

| अ. क्र. | अभियानातील मुख्य घटक | घटकातील उपक्रम | उपक्रमाला अधिकतम गुण | मुख्य घटकांसाठी एकूण गुणांकन |
|---|---|---|---|---|
| 1 | सुशासनयुक्त पंचायत (लोकाभिमुख सक्षम पंचायत शासन) | लोकाभिमुख प्रशासन: | 1 | (१६ गुण) |
| | | नागरी सेवा सुविधा केंद्र (CSC): | 1.5 | |
| | | तक्रार निवारण: | 1 | |
| | | ग्रामपंचायत वेबसाईट: | 1 | |
| | | CCTV बसवणे: | 1 | |
| | | दप्तर अद्ययावत व लेखापरीक्षण: | 2 | |
| | | ग्रामपंचायत सभा व कार्यवृत्तांत नोंदी: | 1 | |
| | | ग्रामविकास समिती कामकाज: | 1 | |
| | | मतदार/नागरिकांनी ॲप डाउनलोड करणे: | 1 | |
| | | आयुष्मान भारत कार्ड: | 2 | |
| | | अनिवार्य तरतूद व खर्च: | 1.5 | |
| | | दिव्यांग ओळखपत्र: | 1 | |
| 2 | सक्षम पंचायत (स्वनिधी, CSR व लोकवर्गणीतून आर्थिकदृष्ट्या सक्षम करणे) | कर व पाणीपट्टी वसुली: | 7 | (१० गुण) |
| | | लोकवर्गणी: | 2 | |
| | | स्वउत्पन्न (OSR): | 1 | |
| 3 | जल समृद्ध, स्वच्छ व हरित गाव | पाण्याचा ताळेबंद: | 1 | (१९ गुण) |
| | | शुद्ध पिण्याच्या पाण्याचा पुरवठा: | 1 | |
| | | विद्युत देयके: | 2 | |
| | | पिण्याच्या पाण्याचे स्रोत बळकटीकरण: | 1 | |
| | | रेन वॉटर हार्वेस्टिंग युनिट: | 1 | |
| | | सूक्ष्म सिंचनाखालील क्षेत्र वाढवणे: | 0.5 | |
| | | अपारंपरिक ऊर्जा व सौर ऊर्जा वापर: | 4 | |
| | | वृक्ष लागवड व वृक्ष संवर्धन: | 2 | |
| | | संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान: | 1 | |
| | | प्लॅस्टिक बंदी | 1 | |
| | | घनकचरा व्यवस्थापन: | 1.5 | |
| | | सांडपाणी व्यवस्थापन: | 1 | |
| 4 | मनरेगा व इतर योजनांशी अभिसरण | महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजनेची प्रभावी अंमलबजावणी | 2 | (६ गुण) |
| | | निर्मल शोषखड्डा, जलतारा कामे, विहीर पुनर्भरण, रेन वॉटर हार्वेस्टिंग | 1 | |
| | | नवीन विहीर/विहीर दुरुस्ती/विहीर पुनर्भरण, शेततळे, ढाळीचे बांध, अनगड दगडी बांध कामे | 1 | |
| | | जनावरांचा गोठा/कुक्कुटपालन शेड/ बायोगॅस उभारणी/ शेळीपालन शेड, नॅडेप /व्हर्मी कंपोस्टिंग, कांदा चाळ | 1 | |
| | | घरकुल व मनरेगा अभिसरण | 1 | |
| 5 | गावपातळीवरील संस्था सक्षमीकरण | ग्रामपंचायत सक्षमीकरण | 3.5 | (१६ गुण) |
| | | शाळा सुविधा सक्षमीकरण | 4.5 | |
| | | अंगणवाडी सुविधा सक्षमीकरण | 2 | |
| | | पशुवैद्यकीय उपचार केंद्र | 1 | |
| | | स्मशानभूमीमध्ये शेड, पाण्याची सोय, सौर दिवे, पोहोच रस्ता, वृक्षारोपण | 2 | |
| | | व्यायामशाळा/खुली व्यायामशाळा सुविधा | 1 | |
| | | धार्मिक स्थळांचे सुशोभीकरण | 2 | |
| 6 | उपजीविका विकास, सामाजिक न्याय | प्रधानमंत्री आवास योजना व राज्यस्तरीय घरकुल योजना | 7 | (२३ गुण) |
| | | भूहीन/जागा नसलेल्या लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करून देणे | 2 | |
| | | बचत गटांमध्ये महिला सहभाग | 2 | |
| | | बचत गटातील महिलांना 'लखपती दीदी' करणे | 3 | |
| | | स्वयंसहायता समूह आणि शेतकरी उत्पादक संस्थांमध्ये महिलांचा सहभाग | 1 | |
| | | स्वयंरोजगारासाठी कौशल्य प्रशिक्षण व कर्ज वाटप | 2 | |
| | | सामाजिक अर्थसहाय्य योजना | 3.5 | |
| | | शेतकऱ्यांचा गटशेतीमध्ये सहभाग | 1 | |
| | | ॲनिमिया मुक्त गाव संकल्पना | 1 | |
| 7 | लोकसहभाग व श्रमदान माध्यमातून लोकचळवळ निर्माण करणे | लोकसहभाग व श्रमदानातून चळवळ: | 1.5 | (५ गुण) |
| | | श्रमदान कार्यक्रमात ग्रामस्थांचा सहभाग | 1 | |
| | | रस्त्याची कामे व रस्ते दुरुस्ती | 2.5 | |
| 8 | नावीन्यपूर्ण उपक्रम | ग्रामपंचायतीने राबवलेल्या प्रत्येक नावीन्यपूर्ण उपक्रमासाठी १ गुण, जास्तीत जास्त ५ गुण दिले जातील. | 1 ते 5 | (५ गुण) |